जा.क्र. आपोआ./प.प्रा.वि./3663 /२०१८
दिनांक: ११ /१० /२०१८

# प्रेस नोट

पत्ता विचारण्याचा बहाणा करून आरोपींनी चेन जबरदस्तीने ओढून तोडून चोरून नेली आहे. तसेच त्यास फिर्यादीने विरोध केला असता धारदार शस्त्राने फिर्यादी यांना जखमी करून निघून गेले म्हणून खालील आरोपींविरूध्द अलंकार पोलीस स्टेशन गु.र.नं. ८८/२०१८ भा.द.वि. कलम ३९७, ३९४, ३४, आर्म ॲक्ट कलम ४ (२५) (२७), म.पो अधिनियम कलम १४२, ३७ (१) (३) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

१. समीर हज्जु पठाण, वय २६ वर्षे, रा.सध्या मु.पो.हळगाव, ता. जामखेड, जि.अहमदनगर, मुळपत्ता पाण्याचे टाकीमागे, सहयोगनगर रामनगर झोपडपट्टी, वारजे माळवाडी, पुणे.
२. राहुल गजेंद्र कांबळे, वय १९ वर्षे, रा. शंकर मंदिराजवळ, पानमळा वसाहत, सिंहगड रोड, पुणे.
३. नितीन उर्फ निगऱ्या लक्ष्मण तांबारे, वय २७ वर्षे, रा. लक्ष्मीनगर झोपडपट्टी, डहाणुकर कॉलनी, कोथरूड, पुणे

समीर हज्जु पठाण, वय २६ वर्षे, रा.सध्या मु.पो.हळगाव, ता. जामखेड, जि.अहमदनगर, मुळपत्ता पाण्याचे टाकीमागे, सहयोगनगर रामनगर झोपडपट्टी, वारजे माळवाडी, पुणे हा टोळी प्रमुख असुन त्याचे वरील साथीदार हे सातत्याने दहशत व हिंसाचारांचा अवलंब करून आपल्या टोळीस आर्थिक फायदा मिळवण्यासाठी मृत्यू किंवा जबर दुखापत घडविण्याच्या प्रयत्नासहीत जबरी चोरी करणे, जबरी चोरी करताना इच्छापुर्वक गंभीर दुखापत करणे, जबरी चोरी, खुनाचा प्रयत्न, जबर दुखापत इ. अशाप्रकारचे गुन्हे करीत आहेत.

सदर आरोपींच्या बेकायदेशीर कृत्यांना व संघटीत गुन्हेगारी व त्यांच्या दहशतीस आळा बसावा म्हणुन सदरील गुन्ह्यास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (१) (ii) व ३ (४) चा अंतर्भाव करण्यास मंजूरी देण्यात आली असून सदरील गुन्ह्याचा तपास सहा पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग, पुणे शहर हे करीत आहेत.

(सही) ११/१०/१८
( रविंद्र सेनगांवकर )
अपर पोलीस आयुक्त,
पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर.